

# बोगद्यातून सुसाट धावली भूमिगत मेट्रो

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ प्रकल्पाने आणखी एक महत्वाचा टप्पा पार केला.प्रथमच भुयारी मार्गात मेट्रोची चाचणी यशस्वीपणे करण्यात आली. या चाचणीमुळे मेट्रो ३ ट्रॅकवरून धावण्यास सज्ज असल्याचे संकेत मिळाले आहेत.यापूर्वी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत ट्रेनची चाचणी घेण्यात आली होती.मात्र ती बोगद्यात नव्हती.मरोळ येथे कारडेपोसाठी बनवण्यात आलेल्या तात्पुरत्या रॅम्पवर चाचणी घेण्यात आली होती आणि ती ठराविक अंतरापर्यंत होती.,यावेळची चाचणी मात्र थेट भुयारी मार्गातील ट्रॅकवर घेण्यात आली.ट्रॅक टाकण्याची कामेही पूर्ण झाली आहेत. आणखी एक ट्रेन मुंबईत दाखल होणार आहे.या ट्रेनचीही भुयारातच चाचणी घेतली जाईल.३३.५ किमीचा हा मेट्रो मार्ग आहे.